जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ०१ दिनांक - ०२/०१/२०२३**

## भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर

## सिंहगड कॅम्पस मध्ये कोयत्याने दहशत माजवणारे मोरक्याच्या बीड येथुन आवळल्या मुसक्या

दिनांक २८/१२/२०२२ रोजी रात्रौ सिंहगड कॅम्पस मध्ये फिर्यादी हे त्यांचे मित्रांसोबत गप्पा मारत बसले असताना,नमुद आरोपी करण अर्जुन दळवी व त्याचा साथीदार यांनी दहशत पसरविण्याच्या इरादयाने हातात लोखंडी कोयता घेवुन,हातातील कोयता हवेत फिरवुन येणारे-जाणारे लोकांना धाक दाखवुन,दुकानांचे शटरवर वार करुन,रोडचे कडेला असलेल्या गाडयांवर कोयता मारुन दहशत निर्माण केल्याने तेथील लोकांनी दुकाने बंद करुन सैरावैरे पळुन गेली. त्यावेळी तेथील स्टुल फिर्यादी यांचा मित्र तन्मय ठोंबरे याचे पाठीवर फेकुन मारला. तसेच फिर्यादी यांचे मानेवर जीवे मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने वार करुन जखमी केले होते. सदरबाबत **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.८७७/२०२२,भादंवि कलम ३०७,३२३,५०४,४२७, ३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियक कलम ३७(१)(३)१३५,भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५, क्रिमीनल अमेंन्टमेंट ॲक्ट कलम ७** अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी करण अर्जुन दळवी याचा भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे शोध घेत असताना **पोलीस अंमलदार, हर्षल शिंदे व धनाजी धोत्रे** यांना आरोपी करण अर्जुन दळवी हा बीड येथे लपुन बसला आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीहरी बहीरट यांनी लागलीच तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार,हर्षल शिंदे, धनाजी धोत्रे व सचिन गाडे यांनी आरोपीचा शोध घेणेकामी रवाना केले होते. त्यानुसार त्यांनी बीड येथे जावुन आरोपी **करण अर्जुन दळवी,वय-२१ वर्षे, रा.माणिकबाग,सिंहगड रोड,पुणे** याचा शोध घेतला असता तो साठे चौक,बीड येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन अटक केली आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्रीमती.सुषमा चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीहरी बहीरट तसेच पोलीस निरीक्षक,(गुन्हे),विजय पुराणिक, सहा. पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उप-निरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार,हर्षल शिंदे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, शैलेश साठे, सचिन सरपाले, चेतन गोरे, मंगेश पवार, निलेश ढमढेरे, अभिजीत जाधव, अवधुत जमदाडे, निलेश खैरमोडे, अशिष गायकवाड, अभिनय चौधरी, मितेश चोरमोले व राहुल तांबे यांचे पथकाने केली आहे.



महाराष्ट्र पोलीस
पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२४३६५१००
पुणे पोलीस